# हिंदुत्व

**लेखक**
हिंदुहृदयसम्राट स्वातंत्र्यवीर
**विनायक दामोदर सावरकर**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**हिंदुत्व : विनायक दामोदर सावरकर**

© **हिमानी सावरकर**

**जनआवृत्ती संकल्पना : श्री. नानासाहेब गोडसे**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**दुसरी आवृत्ती**
मे, २०१२ - २००० प्रती

**किंमत**
जनआवृत्ती रुपये १००/-

# हिंदुत्व

## आभार

राष्ट्रहिताच्या दृष्टीने
'हिंदुत्वा'चा
प्रचार आणि प्रसार
होणे आवश्यक आहे,
हे
लक्षात घेऊन
ज्यांनी
या पुस्तकप्रकाशनाला
बहुमोल सहकार्य दिले
त्यांचे
हार्दिक
आभार!

**–विक्रम सावरकर**

# कारण

हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासात हिंदू जनतेचे सर्वात मोठे शिरकाण १९४६ ते १९७१ या काळात झाले आहे. 'हिंदू' असण्याच्या एकमेव अपराधासाठी देशाच्या दुर्दैवी फाळणीसमयी आणि नंतर, पूर्व बंगाल, पश्चिम पंजाब, सिंध, सीमा प्रांत येथे लक्षावधी हिंदू जनतेला धर्मवेड्या मुसलमानांनी ठार मारिले. हिंदू स्त्रियांवर अनन्वित अत्याचार केले. हिंदूंची घरेदारे, शेतीवाडी लुटली आणि उर्वरित लक्षावधी हिंदूंना निर्वासित करून भारतात हाकलून दिले. अगदी अलीकडे पापस्तानच्या धर्मांध मुस्लिम सैनिकी शासनाने पूर्व बंगालमधील सत्तास्पर्धेचा लाभ उठवून वरवर पाहता शेख मुजिबूर रहमानला नामशेष करण्याच्या नावाखाली प्रत्यक्षात तेथील हिंदूंचे सामुदायिक शिरकाण करून सुमारे एक कोटी हिंदूंना भारतात बळजोरीने पिटाळून लावले। पूर्व बंगालच्या भीषण हत्याकांडामुळे आणि त्यातून उद्भवलेल्या निर्वासितांच्या राष्ट्रीय संकटामुळे आपल्या देशाला अग्निदिव्यातून जावे लागत आहे!

आपण हिंदू आहोत म्हणून जेव्हा आपल्यावर अत्याचारी आक्रमणे होतात तेव्हा आपण हिंदू म्हणूनच संघटित होऊन अत्याचारी आक्रमणे मोडून काढणे अत्यावश्यक ठरते. परंतु हिंदू जातीच्या दुर्दैवामुळे, अजूनही स्वतंत्र भारताचे शासन आणि बहुसंख्य जनता हे सत्य आत्मसात करण्यास सिद्ध नाही! बहुसंख्य हिंदूंनी स्वत्व विसरून भ्रांत निधर्मी धोरणाचा आत्मघातकी स्वीकार केल्यानेच सर्वनाशाचे संकट कोसळले आहे. आपण हिंदू नसून अन्य कोणी आहोत, असे सांगण्यात अजूनही अनेकजण धन्यता मानीत आहेत. 'हिंदूधर्म' म्हणजे केवळ वेदांचे प्रामाण्य मानणारा 'श्रुतिस्मृति पुराणोक्त' धर्मच होय, असा अपसमज

करून घेतल्यामुळे वैदिक धर्ममत न मानणारे शीख, जैन, लिंगायत इत्यादी पंथांचे लोक अहिंदू गणले जाऊ लागले, आपसातच फुटीरपणाची वृत्ती बाळगू लागली. आपल्या राष्ट्रीय ऐक्याला तडा जाऊ नये या हेतूने स्वातंत्र्यवीर सावरकरांनी 'हिंदू' जाती, धर्म आणि राष्ट्र यांच्या उत्क्रांतीच्या इतिहासाचा सखोल अभ्यास करून केवळ धर्माधिष्टीत नसलेली अशी 'हिंदू' या शब्दाची सर्वांना मान्य होऊ शकणारी व्याख्या सिद्ध केली. राष्ट्रीय ऐक्य अचूकपणे साधणाऱ्या 'हिंदुत्व' या नव्या व्यापक अर्थाचा शब्द त्यांनी प्रचारात आणला. हिंदूराष्ट्राला संजीवनी देणारे महान संशोधन त्यांनी 'हिंदुत्व' या मूळ इंग्रजीत लिहिलेल्या ग्रंथात समाविष्ट केले.

१९०६ ते १९१० या काळातील लंडनमधील वास्तव्यात स्वातंत्र्यवीर सावरकरांनी प्रथम या प्रश्नावर लक्ष केंद्रित केले. त्यांचे संशोधन पूर्णत्वाला पोचण्याच्या पूर्वीच राज्यक्रांतीच्या आरोपाखाली त्यांना लंडन येथे पकडण्यात येऊन, दोन जन्मठेपींची शिक्षा ठोठावून ब्रिटिश शासनाने त्यांची अंदमानात पाठवणी केली. अंदमानच्या भीषण कारावासात त्यांनी सतत मनन आणि चिंतन करून 'हिंदुत्व' ग्रंथाची रूपरेखा पूर्ण केली. परंतु ग्रंथाचा आराखडा कारागारातील भिंतीवर आणि स्मरणशक्तीतच मर्यादित राहिला. पुढे सुदैवाने अंदमानातून सुटका होऊन त्यांना रत्नागिरीच्या बंदीशालेत ठेवण्यात आले. येथे चोरून-मारूनच पण थोड्या सुलभतेने लेखनसाहित्य प्राप्त झायावर त्यांनी ग्रंथांचे हस्तलिखित गुपचूपपणे कारागृहाबाहेर पाठविले. 'अभिनव भारत' या क्रांतिकारी संस्थेचे सदस्य आणि सुप्रसिद्ध देशभक्त अधिवक्ता श्री. विश्वनाथ विनायक केळकर (नागपूर) यांनी हा ग्रंथ १९२३ मध्ये प्रथम प्रकाशित केला. 'लेखक' म्हणून 'मराठा' हे टोपण नाव छापण्यात आले होते. कारण स्वातंत्र्यवीर अजून बंदीतच होते. केवळ स्थानबद्ध म्हणून त्यांना रत्नागिरी येथे ठेवण्यात आले. पुढे स्वातंत्र्यवीरांचे धाकटे बंधू डॉ. नारायण दामोदर सावरकर यांनी १९२६-२७ च्या सुमारास मूळ इंग्रजी ग्रंथाचे मराठीत भाषांतर केले. या अनुवादाची दुसरी आवृत्ती १९३३ मध्ये प्रकाशित झाली. हिंदीतही या ग्रंथाचे भाषांतर प्रसिद्ध झाले. खंडित भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतर १९४७ मध्ये या ग्रंथाचे अन्य अनुवादकाने आणखी एक मराठी भाषांतर केले आणि ते प्रकाशित झाले.

'हिंदुत्व' या मूळ इंग्रजी ग्रंथाच्या प्रकाशनाला आज चार तपे होऊन गेली. तरीही तात्त्विकदृष्ट्या या ग्रंथातील प्रतिपादनात एका अक्षराचाही पालट करण्याची आवश्यकता भासली नाही! स्वतः स्वातंत्र्यवीर म्हणत त्याप्रमाणे आणखी दोन शतके तरी 'हिंदुत्वा'च्या तत्त्वज्ञानाची आपल्या राष्ट्राला नितांत आवश्यकता राहील. पुढे परिस्थितीत सुधारणा झाली तर उत्क्रांत मानवतावादाचा अंगिकार करण्याचे सूत्रही त्यांनी या ग्रंथात विशद केले आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी पुरस्कारिलेले 'हिंदुत्वाचे' तत्त्वज्ञान म्हणजे हिंदूराष्ट्रवादाची गीताच होय! फाळणीपूर्व काळात बहुसंख्य हिंदूंनी 'हिंदुत्वा'चा पाठपुरावा केला असता तर मातृभूमीचे विभाजन झाले नसते. खंडित स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर भारतीय शासनाने आणि जनतेने 'हिंदुत्वा'चा अंगिकार केला असता तर हिंदूसंघटनवादाच्या भरभक्कम पायावर राष्ट्रीय एकात्मता साधता आली असती. मुस्लिम आणि इसाई तुष्टीकरण नीतीमुळे झालेली देशाची अपरिमित हानी टाळता आली असती. भारताच्या राजकारणाला 'हिंदुत्वाचा' कणा नसल्यामुळेच पूर्व बंगालच्या भीषण हत्याकांडाचा तडाखा एक कोटी हिंदू निर्वासितांच्या स्वरुपात भारताला सहन करावा लागला! अजूनही उर्वरित हिंदू समाज आणि राष्ट्र सर्वनाशापासून वाचवावयाचे असेल तर स्वातंत्र्यवीर सावरकर प्रणीत हिंदुत्वाचा, हिंदूराष्ट्रवादाचा अंगिकार करणे हाच रामबाण उपाय आहे. हिंदू जनतेला संकटातूनच शहाणपण सुचते, हा अनुभव लक्षात येऊन हिंदू समाजाची अग्निपरीक्षा चालू असताना 'हिंदुत्वाचा' प्रचार करण्याच्या हेतूने स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या मूळ इंग्रजी ग्रंथाची, डॉ. ना. दा. सावरकर यांनी अनुवादित केलेल्या मराठी भाषांतराची ही तिसरी आवृत्ती प्रकाशित करीत आहोत!

**-विक्रम नारायण सावरकर**

# डॉ. नारायण दामोदर सावरकर

भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या इतिहासात 'सावरकर युग' म्हणून ओळखला जाणारा कालावधी निर्माण करणाऱ्या सुप्रसिद्ध क्रांतिकारक त्रिवर्ग सावरकर बंधूपैकी सर्वात धाकटे. जन्म दि. २५ मे १८८८. बालपणापासून वडील बंधूंच्या पावलावर पाऊल ठेवून 'अभिनव भारत' या क्रांतिकारी संस्थेत सक्रिय. वयाच्या केवळ अठराव्या वर्षी इतिहासप्रसिद्ध राज्यक्रांतीच्या 'नाशिक कट' खटल्यात सहा महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा झाली. वडील बंधू (कै.) गणेशपंत (क्रांतिवीर बाबाराव सावरकर) आणि (कै.) विनायक (स्वातंत्र्यवीर सावरकर) या दोघांमधील गुण आत्मसात केले. भावनोत्कट प्रभावी वक्ते, प्रतिभावंत लेखक, साहसी क्रांतिकारक, कुशल संघटक, धूर्त नि चतुर गुप्त कार्यकर्ता, असीम त्यागी आणि प्रेमळ मनमिळाऊ प्रसन्न स्वभावाचे नेते म्हणून नारायणरावांनी लौकिक मिळविला. दोघे वडील बंधू काळ्यापाण्यावर गेल्यावर कोवळ्या वयातच कुटुंबपोषणाचा, क्रांतिकार्याचा आणि स्वतःच्या शिक्षणपूर्तीचा भार पडला. क्रांतिकार्य करीत असतानाच कलकत्ता येथे डॉक्टरीचा शिक्षणक्रम पूर्ण केला. १९०९ साली कर्णावती येथे व्हाइसराय लॉर्ड मिंटोवर फेकलेल्या बॉंब प्रकरणी संशयावरून अटक. पुढे पुराव्याअभावी सुटका, १९१२ मध्ये दिल्लीत लॉर्ड हार्डिंजवर बॉंब फेकला गेला, त्या प्रकरणी नारायणरावांना संशयावरू कलकत्ता येथे अटक झाली. पुढे पुराव्याअभावी सुटका झाली. १९१६ मध्ये डॉक्टरीचा शिक्षणक्रम पूर्ण करून पुढे मुंबईत व्यवसाय सुरू केला. त्यानंतर राजकीय सामाजिक कार्य करीत असतानाच अंदमानाला जन्मठेपेची शिक्षा भोगीत असलेल्या दोघा वडील बंधूंच्या सुटकेसाठी वैधानिक मार्गाने अविश्रांत प्रयत्न केले. मुंबई पालिकेचे सदस्य म्हणून ते निवडून आले होते.